दिनांक: - 5 NOV 2018

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**महानिर्मिती जाहिरात क्र.०२(Feb)/२०१८ अन्वये सरळसेवेकरीता प्रसिध्द करण्यात आलेल्या उप कार्यकारी अभियंता (स्थापत्य) [Dy.Executive Engineer(Civil)] या पदाच्या कागदपत्रे पडताळणीअंती पात्र व अपात्र आढळून येणाऱ्या उमेदवारांची यादी.**

महानिर्मिती कंपनीतर्फे जाहिरात क्र.०२ (Feb)/२०१८ अन्वये उप कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदाची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर पदाच्या ऑनलाईन परीक्षेत प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे व जाहिरात देण्यात आलेल्या रिक्त पदाच्या अनुषंगाने आणि सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेऊन १:४ प्रमाणात कागदपत्रे पडताळणी दि.२१.०४.२०१८ रोजी घेण्यात आली होती. करीता, कागदपत्रे पडताळणीवेळी उमेदवारांनी सादर केलेली सर्व कागदपत्रे (शैक्षणिक अर्हता व अनुभव वगळून) ही कागदपत्रे पडताळणीच्या दिनांकापर्यंत म्हणजे दि.२१.०४.२०१८ रोजीच्या पूर्वी प्राप्त केलेली व कागदपत्रे पडताळणी दिवशी म्हणजे दि.२१.०४.२०१८ रोजी वैध असलेली असणे आवश्यक होते. तसेच शैक्षणिक अर्हता व अनुभव हा जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत म्हणजेच दि.१५.०२.२०१८ पर्यंतचा धारण केलेला असणे आवश्यक होता.

उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणीच्या दिवशी सादर केलेल्या अनुभव प्रमाणपत्रांची वैधता तपासणी करण्याकरीता संबंधित कंपनींना या कार्यालयामार्फत पत्र / ईमेल पाठविण्यात येऊन सदर अनुभव प्रमाणपत्रांविषयीचा वैध / अवैध अहवाल मागविण्यात आला. तसेच संबंधित कंपनीकडून अनुभव प्रमाणपत्रांविषयी योग्य ती माहिती या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतरच उप कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदाची पात्र व अपात्र यादी तयार करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने कागदपत्रे पडताळणीअंती पात्र व अपात्र आढळून येणाऱ्या उमेदवारांची यादी प्राप्त करुन घेण्यासाठी उमेदवारांनी खालील ठिकाणी क्लिक ↵ करावे.

**उप कार्यकारी अभियंता (स्थापत्य) [Dy.Executive Engineer(Civil)] या पदाच्या कागदपत्रे पडताळणीअंती पात्र व अपात्र आढळून येणाऱ्या उमेदवारांची यादी.** ↵

**सूचना** :- उप कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदाच्या ऑनलाईन परीक्षेत कमी गुण प्राप्त झाल्याने अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गातंर्गत १:४ या प्रमाणात उमेदवार पात्र झाले नाहीत. सदर पदाच्या भरती प्रक्रियेशी संबंधित पुढील प्रक्रियेची माहिती महानिर्मिती कंपनीच्या www.mahagenco.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

(विनोद बोंदरे)
कार्यकारी संचालक (मासं)
महानिर्मिती